
तारांगणे जीवनाची घातली कित्येक पालथी
रूतले पायी खडे किती हाती फुले प्राजक्ती
निंदले वंदले कुणी तरी जिंकण्याचीच आस
वसा सत्याचा घेतला धरली सत्याचीच कास
हाक आकाशाएवढी मिठी व्याकुळ धरणीस
प्रतिक विजयाचे अखेरी खोचले शिरी 'मुकुटपीस'
चिरंजीव श्रीहरिस शुभाशिर्वाद...
चेतक बुक्स
www.chetakbooks.com
ISBN-
978-93-92211-21-8
₹80/-
मुकुटपीस
सचिन कृष्णा निकम

# मुकुटपीस

© सर्व हक्क सुरक्षित 2014

**रचनाः सचिन कृष्णा निकम**

बी - 706 मॉन्ट वर्ट ग्रॅंड

पाषाण, सुस रोड

पुणे - 411021

मोबाईल ः 9890016825

email: sachinikam@gmail.com

# मनोगत

'मुक्तस्पंदन', 'मुग्धमन', 'मुकुलगंध' आणि 'मुखदर्पन' ह्या काव्यसंग्रहांनंतर ह्याच धर्तीवर 'मुकुटपीस' हा काव्यसंग्रह प्रकाशित करताना मला अत्यंत आनंद होत आहे .

कविता ह्या नुसत्या वाचायच्या नसून त्या हृदयात साठवायच्या असतात, अनुभवायच्या असतात, जगायच्या असतात . त्या एखाद्या लघुपटाप्रमाणे सर्रकन डोळ्यांसमोर उभ्या राहतात, जीवनाचे रहस्य उलगडून दाखवतात, नाती अजूनच घट्ट करतात .

कविता ह्या फक्त कवीने कागदावर गिरगटलेल्या चार ओळी नसून त्यातला मतीतार्थ जाणला पाहिजे, त्यातील कल्पकता आणि नवीन विचार आत्मसात केले पाहिजेत तरच त्या कवितांचे सार्थक होईल .

तारांगणे जीवनाची, घातली कित्येक पालथी

रूतले पायी खडे किती, हाती फुले प्राजक्ती

निंदले वंदले कुणी, तरी जिंकण्याचीच आस

वसा सत्याचा घेतला, धरली सत्याचीच कास

हाक आकाशाएवढी, मिठी व्याकुळ धरणीस

प्रतीक विजयाचे अखेरी, खोचले शिरी **"मुकुटपीस"** .

# अर्पणपत्रिका

सर्व कविताप्रेमींना आणि प्रतिभावंत कवींना सादर भेट .

चिरंजीव श्रीहरिस शुभाशिर्वाद आणि प्रेम .

## अणुक्रमणिका

1 . श्रीहरि
2 . मननिवळी
3 . देव
4 . माणसातील माणूस
5 . ममज्वर
6 . शेवटाची सुरूवात
7 . का अजुनही?
8 . लढा
9 . खटाटोप
10 . नसती उठाठेव
11 . घाई कसली?
12 . मुखवटे
13 . एकात्मता
14 . संचय
15 . उर्मी
16 . मुक्तहास्य
17 . मुखदर्पण
18 . हुंदका
19 . सोसायटी नामक वस्ती
20 . आरामदास
21 . चाकाचा शोध लागण्याआधी
22 . नेंता नेता
23 . आकितच घडलय (भारूड)
24 . द्विहृदयी
25 . झिम पोरी झिम
26 . पहिला वहिला पाऊस
27 . श्रावणात दंगला श्रावण
28 . आई रजेवर जातेय!
29 . कापूस कोंड्याची गोष्ट सांगू का?
30 . माझा मी समर्थ
31 . पिंड
32 . जर्जर

33 . मनाचे काय?
34 . स्पंदनसखी
35 . साथ
36 . मकरंद
37 . प्रियकर माझा निळा
38 . केव्हाचा
39 . प्रेमसंदेश
40 . लावण्यखणी
41 . पण
42 . झुंज
43 . घड्या
44 . घनजल
45 . बरे झाले देवा!
46 . मातीचा पुतळा
47 . अहम् विसर्जन
48 . क्षितिज
49 . कुणी
50 . माझी लेखणी .

## श्रीहरि

15 . 10 . 2013

आकाश पृथ्वी सूर्य नि चंद्र
चिन्मय ब्रह्मांडी व्यापुनि राजेंद्र

सृष्टीचा सृजनकर्ता जीवांचा जीवनदाता
चैतन्याचा स्रोता चराचरांचा भाग्यविधाता

मुनीजनी योगीजनी ज्ञानचक्षू भेटशी
भक्तजनी अलिंगन प्रत्यक्षू देशी

अद्भुत अलौकिक अचिंत्य विहारी
अद्वैत अच्युत अनंत श्रीहरि

वेदांचा गाभा सांगे गीतेचे सार
हरिनामात तल्लीन करारे संसार .

## मननिवळी

06 . 10 . 2013

चंचल मनाच्या लहरी, कधी भरती कधी ओहोटी
रिमझिम पावसाच्या सरी, कधी श्रावणी कधी आषाढी

असे निमिषात बाहुपाशी, उडे निमिषात आकाशी
धावे वेगी अवकाशी, मागे टाकूनि प्रकाशी

चंचल मनाच्या लहरी, कधी मारवा कधी भैरवी
चमचम ऊन्हाच्या सरी, कधी माघ कधी वैशाखी

हे तृषार्त झुळझुळ झ-याचे, कधी कोसळत्या धबधब्याचे
झुलते हिंदोळा वा-याचे, कधी घोंगावणा-या वादळाचे

चंचल मनाच्या लहरी, कधी समाधी कधी तांडवी
बहुरूपी ढगांच्या सरी, कधी धवल कधी कृष्ण

हे सोनेरी वर्षाव उन्हाचे की तप्त ग्रीष्मी झळयांचे
हे शीतल शारदी चांदण्यांचे की गुलाबी हेमंती गारठ्याचे
हे कोवळ्या वासंती पालवीचे की शुष्क शिशिरी पानांचे

जाणतो तो स्थितप्रज्ञ ती अचिंत्य शक्ती
सोडतो तो सूज्ञ ती भौतिक आसक्ती
कल्पतो तो प्रतिभावंत ती अद्भुत किमया
व्यापतो तो चैतन्याने ही सकल दुनिया

नश्वर देही जडती नाना विकारी
अडकते ते षडरिपूंच्या मायाजाळी
संरक्षण संतुलन मनाचे कोण करी ?
जप हरिनाम मंत्राचा “मननिवळी” .

## देव

04 . 12 . 2013

युगायुगांचा विषय संशोधनाचा
अचिंत्य शक्तीला संबोधण्याचा
कवींच्या प्रतिभेतून प्रसवले वास्तव
जगाच्या कल्याणार्थ अवतरले देव

देवाचे अस्तित्व जुमानतो तो आस्तिक
जो अमानतो तो नास्तिक
देवाचे देवपण स्वीकारतो तो स्वस्तिक
जो नाकारतो तो फस्तिक

कुणी शोधतो देवळात तर कुणी रानावनात
कुणी पूजतो मर्तीत तर कुणी निसर्गात
कुणाला भेटतो माणसात तर कुणाला चमत्कारात
कुणी पाहतो अंतरंगात तर कुणी अंतराळात
प्रत्येकाची रीत निराळी येई अनुभुती परमानंदात

हल्ली माणसेच देवाची परीक्षा घेतात
पोटभर खाऊन उपासतापास करतात
ईष्टफळ मिळाले तरच तो पावला

नाहीतर दुस-याचा अंगारा लावला

ओढ मानवाला मानवाची अन् भीती दानवाची
आसक्ती मानवाला प्रपंचाची अन् भक्ती देवाची

माणूस माणसांशी माणसासारखा वागला
 ...तर देवमाणूस
 ...नाहीतर राक्षस

शास्त्रपठणातून काढले अनुमान
योगसिद्धीने वाढले प्रमाण
भक्तीमार्गे घडेल प्रत्यक्ष दर्शन
जैसा भाव तैसे मनदर्पन .

## माणसातील माणूस

01 . 01 . 2014

धर्मांध जगण्याने गमावले स्वतंत्र विचार

जातीपातीच्या राजकारणाने हिरावले सदाचार

कालबाह्य चालीरीती किती दिवस पाळणार

जुनाट रूढींच्या कचाट्यातून सुटका कधी होणार

आता आलीय वेळ स्वतःला जाणण्याची

माणसातील माणूस डोळसा ओळखण्याची

कोणाच्या येण्याने का होई विटाळ

कोणाच्या जाण्याने कसला सूतककाळ

अमुक कार्य मुळी नाही धार्जीन

तमुक घडल्याने झाला बाई अपशकुन

आता आलीय वेळ स्वतःला जाणण्याची

माणसातील माणूस डोळसा ओळखण्याची

मनगटातले विसरूनि बळ वाचे हस्तरेषा

अंतरंगातील सोडून सामर्थ्य झेपे अंतराळदेशा

उद्याच्या सुखासाठी चाललीय आज मरमर

संसारगाडा फरफटत जगतोय आयुष्यभर

आता आलीय वेळ स्वतःला जाणण्याची

माणसातील माणूस डोळसा ओळखण्याची

## ममज्वर

16 . 10 . 2013

एक सूर्य स्वयंप्रकाशी, मम मालवू लागला

द्विज मिथ्य अहंकार, मम खालवू लागला

त्रैलोक्य स्वामी, मम हालवू लागला

चतुर्भुज पराक्रम, मम घालवू लागला

पंचमहाभूत देह, मम चालवू लागला

षड्रिपू पाषांत, मम धावू लागला

सप्तरंगी दुनियेत, मम राहू लागला

अष्टोप्रहरी सुखशोध, मम घेऊ लागला

नवरसी मनमुराद, मम न्हाऊ लागला

दशदिशी निर्वाहार्थ, मम धावू लागला .

जन्मापासून मरेपर्यंत ‘म’ ची बाराखडी

जागताना झापेतही ‘मम’ चाच पाढा रडी

हे माझे ते मला करी मन उदास

झाल सत्वाचा –हास धरी रजाची कास

तमाची पट्टी बांधलीय डोळ्यांवर

चांगलाच फणफणतोय हा ममज्वर .

यावर काय इलाज, कसला औषधोपचार?

वैद्याला बोलवायचे की करायचा परिपूर्ण विचार .

## शेवटाची सुरूवात

03 . 02 . 2014

वाढती लोकसंख्या

धावती जीवनशैली

गलेलठ्ठ महागाई

बेरोजगार तरूणाई

गुदमरणारे प्रदुषण

माणुसकीचे प्रदर्शन

धर्माचा बाजार

भ्रष्टाचाराचा आजार

जंगलांचा ऱ्हास

निसर्गाचा उपहास

ग्लोबल वॉर्मिंग

ओझोन वॉर्निंग

नावाची लोकशाही

कामाची ठोकशाही

दिशाहीन विचार

बंदीस्त आचार

आर्थिक विषमता

निरर्थक समता

पिसाट सांप्रदायिकता

एकतेत विविधता

जीवघेणी स्पर्धा

समतोल अर्धा

अतिरेक संपविण्यासाठी

कात टाकण्यासाठी

शेवटाची झालीय सुरूवात

सामंजस्य राखण्यासाठी .

## का अजुनही?

08 . 03 . 2013

का अजुनही, सीमेवरती सांडती रक्तांचे सडे
का अजुनही, देवळाभवती गुंफती भक्तांचे वेढे
का अजुनही, रानीवनी राबती पामर बापडे
का अजुनही, युवापिढी विसरती इतिहासाचे धडे

दिसमास संवत्सरे, आली गेली भूईवर
त्याच गरजा त्याच समस्या, घोंगावती डोईवर

का अजुनही, मिरविती अंधारात लुकलुकणारे काजवे
का अजुनही, डरावती डबक्यात अल्पज्ञ बेडके
का अजुनही, भटकती सुगंधापाठी मृगकस्तुरी
का अजुनही, शोधिशी मानवा देव राऊळि मंदिरी

दिसमास संवत्सरे, आली गेली भूईवर
तेच विचार तेच आचार, घोंगावती डोईवर

# लढा

08 . 03 . 2013

इथे कायम चाललाय लढा

कुणाचा तरी कुणाशी

काहीतरी मिळवण्यासाठी

काहीतरी जुळवण्यासाठी

सजीवाचा निर्जीवाशी

मानवाचा निसर्गाशी

कर्माचा नशीबाशी

कर्तृत्वाचा नियतीशी

मनाचा बुद्धीशी

सत्याचा अन्यायाशी

सुखाचा शाश्वततेशी

प्रजेचा सत्तेशी

संपत्तीचा आपत्तीशी

कमाईचा खर्चाशी

रंकाचा रावाशी

शहरांचा गावाशी

क्रांतीचा जुलुमाशी

परिवर्तनाचा पुरातनाशी

नाविन्याचा रटाळाशी

रक्ताचा रक्ताशी

पिढीचा पिढीशी

जीवनाचा जीवनाशी

जिंकण्याचा हरण्याशी

जगण्याचा मरण्याशी

काहीतरी करण्यासाठी

जीवनध्येय गाठण्यासाठी

आयुष्यभर मांडलाय लढा

आयुष्य सफल बनविण्यासाठी .

## खटाटोप

01 . 02 . 2014

आलो कुठुन जाणार कुठे
पडता ठाऊक गुंता सुटे
बेडी आसक्तीची तुटे
पाझर शब्दांना फुटे

भूक प्रेमाची हृदयास
झोप शांतीची मनास
शोध सुखाचा प्रयास
आनंदी आनंद जगण्यास

सोडूनि फुका रोष कोप
पावूदे षड्रिपू लोप
उजाडेल दिवस निरोप
यथार्थ सगळा खटाटोप .

## नसती ऊठाठेव

09 . 09 . 2013

दम धर जरासा थांबव भागम् भाग
पाठीमागे काय लागलाय ढाण्या वाघ
चितेसाठी जमवाजमवी चंदनाची लाकडे
इकडून तिकडे उडती झिप-यावाली माकडे

चोमड्या चौकश्या कशाला फुकटच्या
पाय धुवु तर साखळ्या केवढ्याच्या
अमक्याची चुगली तमक्याच्या कानी
फलान्याची गुलुगुलु गुपीत गाणी

चूलीमध्ये अगरबत्यांचा लावलाय जाळ
होत्याच नव्हत अन् जित्याचा महाळ
हाताची घडी ठेव बोट तोंडावरी
काम नाही घरी म्हणून सांडून भरी

हातचे सोडून धावत्याचा पाठलाग
आयत्या बिळावर कसा डुलतोय नाग
रेशमाच्या किड्यापरी स्वतःला गुंडाळी
मासे पकडायला कोष्टी विनतो जाळी

हे पण ते पण जेवढ जमतय तेवढच कर

एक ना धड केल्या चिंध्या भाराभर

शेंदूर फासून दगडाला पावतो कुठे देव

जिथले तिथेच ठीकठाक नको नसती उठाठेव .

## घाई कसली ?

09 . 06 . 2013

इथे घाई कशाला अन् कशाची ?
कर कर करण्याची नि मर मर मरण्याची
फिर फिर फिरण्याची नि तंगड्या धरून बसण्याची
खा खा खाऊन परसाकड जाण्याची
बडबड बडबडून नको ते गरळण्याची
नातीगोती विसरून स्वार्थी जगण्याची .

इथे घाई कशाला अन् कशासाठी ?
किती उकलशील जन्ममरणाच्या गाठी
हातचे सोडून पळण्यात तथ्य नाही
अधीर होऊन खेळण्यात अर्थ नाही
कुठवर कुठे कुठे पळणार दिशा दाही
नको अपेक्षा फळाची उगी अंगाची लाही लाही .

इथे घाई कशाला अन् कुणासाठी ?
किती गमवशील धीर हव्यासापोटी
वेळच्या वेळी होऊदे प्रत्येक गोष्ट
धुक्यातून वाट दिसूदे तरी स्पष्ट
अवसान येवूदे मग उपस कष्ट
समय समाप्तीला होणर देह नष्ट .

सोसुनि नऊ मासांची कळ

माय पहाते गोंडस बाळ

थोडासा धर धीर

थोडासा काढ कड

झुकेल पायाशी

प्रत्यक्ष कळीकाळ .

## मुखवटे

22 . 03 . 2014

ह्या रंगबदलत्या दुनियेत
हे बिनधास्त ठोकती खोटे
आज पांढरा उद्या काळा
परवा निराळा मिरवती मुखवटे

होईल फसगत पाहुनि
लुटतील ठग फुकटे
बहुरूपी सोंगे घेऊनि
फसवतील ढोंगी मुखवटे

दिसण्यावर जाऊ नका
टोपी पगडी वा फेटे
पडेल पितळ उघडे
भुलवतील लबाड मुखवटे

राहा सावधान सदा सतर्क
राजा, वजीर कोण मोहरे
चटकन् विश्वास टाकण्याआधी
तपासा मुखवट्यामागचे खरे चेहरे .

## एकात्मता

18 . 03 . 2014

एकाग्रता इतकी होऊदे की

जीव शीवाशी एकरूप होईल

एक सूर्य असा प्रकाशूदे की

अंधाराचाही एकटेपणा नष्ट होईल

एक दिवस एकमताने उजाडूदे की

सा-या विश्वात एकता नांदेल

एकदा एकत्र सारे एका सुरात गाऊदे की

एकसंघ होऊनि सारे एकात्मता पाहतील .

## संचय

18 . 03 . 2014

फुलांफलांवर हिंडून हिंडून
करते माशी मध गोळा
नसते ठाऊक बापडीला
कुण्या चोराचा त्यावर डोळा

प्रत्येकाची आवड निराळी
काहीतरी जमवण्याची
मिळेपर्यंत आत्मसंतुष्टी
खटपटीने जगण्याची
मांडून प्रदर्शन तयाचे
दुनियेला दाखविण्याची
आस्वाद घेतील बाकीचे
यातच आनंद मानण्याची

जोडला किती पैसा अडका
संपतेय कुठे हाव
पोटपुरते भागले तरी
येऊदे परोपकारी भाव
एक दिवस पडणार आहे

निर्दयी काळाचा घाव

समजून घे जरासा

नियतीचा डाव

सोडून हातचे कशाला

पळत्याच्या मागे धाव

न्याय एकच सर्वांसाठी

रंक असो वा राव

प्रयास सुखाच्या शोधासाठी

शहर असो वा गाव

मावेल ओंजळीत तेवढाच करावा संचय

उरलेले गरजूंना देऊन करावा परिग्रह परिचय .

## उर्मी

14 . 01 . 2014

हाती नव्हते काहीही
होते रीते खिसेही

सोबती नव्हते कुणीही
होते विकट रस्तेही

विसावे नव्हते कुठेही
होते रिकामे उदरही

अनुभव नव्हते कधीही
होते अंधारले धुकेही

सुटले मायेचे ग्रहण
उगवला ज्ञानाचा किरण

झाले नष्ट अवकष्ट
दिसले स्पष्ट उद्दिष्ट

मस्तकी प्रतिभेची शिदोरी
डोळ्यांत चैतन्याची उर्मी .

## मुक्तहास्य

22 . 03 . 2014

बेंबीच्या देठापासून काळजाच्या काठापर्यंत

हृदयाच्या गाभा-यातून मनाच्या लाटांपर्यंत

स्मित का होईना हसू उमटूदे मुखावर

पुरे झाले आता रूसने सुखांवर

जे काही साठलय मनात मोकळ कर थेट

नाही पटल तर मौन, पटल तर गळेभेट

येन केन प्रकारेन व्यक्त करशील स्वतःला

नाहीतर घुस्मटुन आत मारशील स्वतःला

इतरांच्याही भावनांना देशील प्राधान्य

कलागुणांनाही दाद देशील अनन्य

संकटांचा करशील हसून सामना

आपोआपाच पु-या होतील मनोकामना

गंभीर परिस्थितीला हसण्यावारी नको घेऊ

जन्ममरणाचा प्रश्न टोकालाही नको नेऊ

इतके सोपे आहे जीवनाचे रहस्य

भवताली दरवळूदे प्रसन्न 'मुक्तहास्य' .

## मुखदर्पण

22 . 10 . 2012

जे तुझ्या मनी तेच माझ्या मनी
ओळखुनही का आपण असे अनोळखी
मांडू कसे शब्दांत जे जे आजवर जपलेले
तुला पाहता उधानले ते ते अंतरी लपलेले
विसरूनि देहभान जगीचे केले सर्वस्व अर्पण
उमटले सुस्पष्ट भाव मनीचे पाहिले "मुखदर्पण"

जसे विरघळावे केशर दुधात
तशी तू भिनलीस माझ्या मनात
जरी निखळले सारे तारे
मागेन तुलाच पुन्हा जीवनात
बाहुपाशांत मिटुनि नयन . भाळीचुंबन
साकारली स्वप्ने पाहता प्रत्यक्ष "मुखदर्पण"

## हुंदका

29 . 12 . 2013

पडला अकाली घाव काळजावर

मोडला निकाली डाव अर्ध्यावर

काय दिसेना सुन्न अंधार

काही सुचेना विषण्ण निराधार

शिवले ओठ सुकला कंठ

ओघळली आसवे फुंकला श्वास

आखला बेत असा फिस्कटला

मांडला डाव कसा विस्कटला

धगीच्या चटक्यात जीव होरपळला

यातनांच्या फटक्यात श्वास गुदमरला

सांगताही येत नाही लपवताही येत नाही

हुंदक्यावर हुंदका गिळते ग बाई .

## सोसायटी नामक वस्ती

07 . 09 . 2013

सोसायटी नावाची हायफाय वस्ती
कोऑपरेटीव उरलय काय नावाला ?
शेजारी शेजारी फ्लॅट जरी असती
माणूस विसरलाय का माणसाला ?

येता जाता लिफ्टमध्ये भेटती
हाय हॅलोपुरते स्मित हसती
डाएट फॅशनची गॉसिप नुसती
फेस्टीवल पार्ट्यांची धमाल मस्ती

म्हणे आम्ही मॉडर्न झालोय
हे कुत्र्याला की कुत्रा ह्यांना फिरवतोय
म्हणे आम्ही फॉरवर्ड झालोय
साठीचा तरून हाफ चड्डी मिरवतोय

अतिथींनि मात्र फोन करूनच यावे
अहो का काय? ही इथली रीत आहे
इंटेरियरचे गोडवे गावे
अशी जणू सक्त ताकीदच आहे .

सर्वसुखसोयींची सोय खूप भारी

सोसायटी नामक वस्ती नांदतेय न्यारी .

## आरामदास

06 . 10 . 2013

रात्रभर टीव्ही बघत बघत सोफ्यावर लोळणे
दिवसभर जांभया देत देत डोळे चोळणे
खादीला आयत खात खात चघळणे
यापेक्षा जिंदगीत काय ठेवलय वेगळे ?

कामधंदा करण मुळी धार्जिन नाही
पैसा कमविण्याची उगी कशाला घाई
पोटापुरत मिळतय त्यातच समाधान पाही
तो वरचा बघुन घेईल ना सगळ काही

लोकांच काय, ते आळशीच म्हणतात
ऐन तारूण्यात गाठलीय चाळशी म्हणतात
ऐतखाऊपणाचे पडलेय वळण इंद्रियासी
आरामदास नडणाराय आंगलटी एकदिशी .

## चाकाचा शोध लागण्याआधी

22 . 03 . 2014

मानव कुठुन कसा पृथ्वीवर आला

अद्याप नीटस ठाऊक आहे का कुणाला ?

म्हणे, माकडाची उत्क्रांती होऊन माणूस झाला

छे हो, मग अजूनही कशी दिसतात माकडे हुंदडताना

लाखो वर्षांपूर्वी म्हणे बिग बॅंग झाला

त्यातून ह्या ब्रह्मांडाचा जन्म झाला

याचे आकलन होणे जरा कठीनच आहे

उत्पत्तीचे गूढ उकलने, हा तर

हर पिढीचा संशोधनाचा विषयच आहे

असो, समजा मानव पृथ्वीवर अवतरला

तेव्हा तो असेल कसा?

त्याची कोणती असेल बोली?

तो काय असेल खात?

वगैरे वगैरे प्रश्नाची वरात,

थोडक्यात, चाकाचा शोध लागण्याआधीची अवस्था

कसा होता आदिमानव याचीच उत्सुकता...

इतर सजीवांपेक्षा वेगळे असल्याची जाणीव

शेपूट खुंटून शिंगे नसल्याची उणीव

हातापायांवर चालत होता

कंदमुळे फळे खात होता

कमरेला पाने बांधत होता

झाडावर गुहेत राहात होता

रानावनांत भटकत होता

पशुपक्ष्यांशी खेळत होता

एकमेकांशी जवळीक साधत होता

सुखदुःखापल्याड जगत होता

विनाफिकीर झोपत होता

इत्यादी...

## नेंता नेता

18 . 03 . 2014

कुणी म्हणती दादा

कुणी म्हणती शहजादा

नादी नका लागू उगा

काढतो हा बापजादा

कुणी म्हणती बालिश

कुणी म्हणती फुलिश

कुणी म्हणती रणशिंग

कुणी म्हणती डॅशिंग

विचारले एक तर बोलतोय भलतच

बोलतोय एक अन् करतोय उलटच

जनसामन्यांची नुसती मोकळीच माया

खर काय नि खोट काय पोकळ पाया

पुढारीपणाचा फुकटचा आव

शंभर तुकडे एकच घाव

कार्यकर्त्यांनी तिकडे काशी घालावी

गुंतवू नये घोटाळे माझ्या नावी

देश बिश काय ते बघू नंतर

आधी गाठायचे दिल्लीचे अंतर

धरलीय गृहीत अडाणी जनता

म्हणे देश चालवणाराय नेंता नेता .

## आक्रितच घडलय... (भारूड)

19 . 03 . 2014

आव आव आव, ऐकल का...

आक्रितच घडलय म्हणायच की...

कसल आक्रित?

नव्ह आता काय झाल आस्स?

आस्स...काय ईचाराताय घडल आस्स...

आमासनी कायबी ठाव नाय .

तर मग ऐका...

कुंकु गेल अन् टिकली आली

शिकेकाई गेली अन् शॅम्पू आला

पाटा गेला अन् मिक्सर आला

जातं गेल अन् गिरणी आली

नांगर गेला अन् ट्रॅक्टर आला

पत्र गेल अन् ईमेल आला

केवढा म्हणायचा हा बदल झाला .

अहो माणूस प्रगत झाला...

काय सांगताय खर का काय...

भाकरी सोडून पिझ्झा खाल्ला

शेती करायला मंगळावर चालला

अण्वस्त्रांचा साठवून गल्ला

निसर्गावरच चढवलाय हल्ला

विश्वशांतीचा अडकवून बिल्ला

दुस-याच्या खिशावर मारतोय डल्ला

आव आव...आक्रितच घडलय म्हणायच की...

## द्विहृदयी

19 . 03 . 2014

ओलांडून माप लक्ष्मी नांदली घरी

नारायण सहवासी सुखावली अंतरी

लिंबकांचनी कांती झळाळले मुखतेज

गेल ग दिस, आला जीवमंदी जीव

जड झाले ग पाय, अवघडली वाय

गोड बातमी आनंदी, भवताली दरवळली .

आनंद पोटत, आनंद मावेना गगणात

हर्ष मनात, भरला उल्हास तनात

लोणचे लिंबाचे खावे

थंडगार आईसक्रीम चाखावे

मोकाट चांदण्यात भिजावे

दिमाखात घोडे दौडावे

लागले देवीला निरनिराळे डोहाळे

स्पंदने लागली बोलू गुजगोष्टी सवे

झालीस ग तू झालीस द्विहृदयी सये .

## झिम पोरी झिम

07 . 09 . 2013

झिम पोरी झिम
पांडवांचा भीम
कौसेल्येचा राम
यशोदेचा श्याम .

ऊठ बाई ऊठ
शेंगदाण्याच कुट
पुरणाची पोळी
मूगाचे सांडगे
आंब्याच लोणच
तांदळाची खीर
सासूबाईना मूळीच नसतो धीर .

ऊठ बाई ऊठ
कारळ्याच कुट
मिरचीच ठेचा
उडदाचे पापड
लिंबाच लोणच
साबुदाण्याची खीर

नंदेला लग्णाची नाही फिकीर .

ऊठ बाई ऊठ

जवसाच कुट

मसाल्याची फोडणी

कोथिंबिरीची वडी

मिरचीच लोणच

शेवयाची खीर

जावूबाई ऐटीत सोडे हुकुमतीर .

ऊठ बाई ऊठ

राजिग-याच कुट

उकडीचे मोदक

अळूची वडी

हळदीच लोणच

रव्याची खीर

तिकडची स्वारी रूबाबवीर .

झिम पोरी झिम

पांडवांचा भीम

कौसेल्येचा राम

यशोदेचा श्याम .

मोत्यांची नथणी, भरजरी पैठणी

लाखेचा चुडा,कुंकवाचा करंडा

चांदीची पैंजण, सोन्याचा डोरल

चांदीची जोडवी, हि-याची अंगठी

कोल्हापुरी चपल्या, सोन्याच्या पाटल्या

केसाचा अंबाडा, मोग-याच गजरा

मुखडा लाजरा, बघतायत नजरा .

## पहिला वहिला पाऊस

18 . 03 . 2014

घन दाटले दाटले नभ पटावर
एकमेकांना वाटले डोंगर तटावर
मन भिजले भिजले नदी काठावर
झाले आरूढ नाचले आनंदी लाटांवर

आल्या आल्या सरी भूईला बिलगल्या
माहेरवाशीन जश्या कुशीत माईच्या लोळल्या
खाली आनंद वर आनंदी आनंद
भवताली उल्हास दरवळला सुगंध

पहिला वहिला पाऊस पाहिला पाहिला
टाकूनि व्याप सारे जीव आनंदे वाहिला .

## श्रावणात दंगला श्रावण

09 . 09 . 2013

हिरव्या धरणीवर लावण्य सोहळा
नेसल्या लतिका सुमनांच्या माळा

उत्तुंग नभाचा घुमट निळा
लावुनि माथ्यावर तेजस्वी टिळा

अथांग सागराचा रूबाब वेगळा
डौलात किनारी लोटांगन खळखळा

उधान वा-याचा बेतच निराळा
विखुरला भवताली प्रीतगंध जिव्हाळा

फुटले पंख मेघांना
वाकड्या तिकड्या रेघांना
मिळाला एकांत दोघांना
ऊनसावलीच्या रंगांना
पाठशिवणीचा खेळ रंगला
श्रावणात श्रावणही दंगला .

## आई रजेवर जातेय!

03.04.2014

काय? आई रजेवर जातेय!

खरच, ऐकून बसला ना धक्का

होय, तिने केलाय निर्णय पक्का

कुठतरी निवांत स्थानी

क्षणभर विश्रांती घ्यावी

कधीतरी मुभा द्यावी

महिनाभर रजा हवी

आई तुझ्याविना,

कस होणार आमच?

आई तुझ्याविना,

पानही नाही हलणार आमच...

आम्हाला मुळीच करमणार नाही

रिकामे घर उठेल खायी

शाळेला नोकरीला जशी मिळते सुट्टी

मलाही वाटले तशी घ्यावी जराशी

आई तू नको ना बनूस हट्टी
आम्हाला सोडून नको जावूस एकटी

बारा महिने चोवीस तास
चालू असतात माझे हात
थोडासा मोकळा घ्यावा श्वास
परतेन लवकरच ठेवा विश्वास

भल्या पहाटे उठून
काढतेस घर विसळून
स्वयंपाक भांडी धुणी
रोजचीच कहानी
सगळयांची घेते काळजी
स्वतःची मात्र हालगर्जी

चुकलो ग आई माफ कर
कल्पना रजेची साफ कर
आम्ही सगळी तुझी लेकरे
तुझेच ऐकणार तुझी पाखरे

शहाणी माझी बाळे फार
रद्द केला रजेचा विचार

आपण सगळेच जावूया
छान छान ठिकाणे पाहूया
मौजमस्ती करूया
गोड धोड खावू खावूया .

## कापूसकोंड्याची गोष्ट सांगू का?

03.04.2014

कापूसकोंड्याची गोष्ट सांगू का?

सांग

सांग काय म्हणतोस,

कापूसकोंड्याची गोष्ट सांगू का?

सांग

सांग काय म्हणतोस,

कापूसकोंड्याची गोष्ट सांगू का?

आता सांगतो का गुमान...

तर मग ऐका...

एक होता कापूसकोंड्या

त्याच नाव होत धोंड्या

अंभेरी गावात रहात होता

कापूस पिंजून विकत होता

एकदा तो बाजारात गेला

दुप्पट किंमतीने कापूस विकला

मग काय तो अजूनच शेफारला

फुकटचे फुटाने खिशात भरले

त्यावर दुकानदाराचे गच्चूरे धरले

रस्त्यात भेटली सतरा माकडे

कापूसकोंड्याने त्यांना दावले वाकडे

माकडांना आला भलताच राग

सुरू केला त्याचा पाठलाग

कापूसकोंड्या पुरता घाबरला

एका खोलीमध्ये लपून बसला

एक माकड खिडकीतून शिरले

डिंकाचे घमेले लवंडून दिले

कापूसकोंड्याची उडाली घाबरगुंडी

घसरून डिंकात मारली मुसंडी

सगळ्या अंगाला डिंक चिकटला

कसाबसा बिचारा तिथून सटकला

दुस-या खोलीत बसला लपून

उतरले माकड कौले फोडून

कापूसकोंड्याची उडाली घाबरगुंडी

कापसाच्या ढीगात मारली मुसंडी

सगळया अंगाला कापूस चिकटला

पांढराफटक अवतारच झाला

पाहून त्याला माकडे चवताळली

हुपल्या हुप विचकू लागली

कापूसकोंड्याला फुटला घाम

थरथर कापू लागला जाम

तिस-या खोलीत बसला लपून

डोळा माकडांचा चुकवून

कापूसकोंड्या कुठेच सापडेना

आता मात्र माकडांना राहावेना

सगळयाच माकडांनी केला हल्ला

खिडक्या दारे छतही तोडला

रंगाची बादली फेकली अंगावर

कापूसकोंड्या माखला काळया रंगावर

पण गंमत अशी झाली...

कापूसकोंड्या दिसू लागला अस्वल

चिडून करू लागला माकडांची नक्कल

आता माकडांची उडाली धांदल

घाबरून ठोकली धूम लांबवर

कापूसकोंड्याला हायसे वाटले

थेट गावचे पारच गाठले

अस्वल समजून गावक-यांनी

पिछा केला दहा जनांनी

कापूसकोंड्या सुटला पळत

धपकन मारली उडी विहरीत

दोन मिनिटे लोक बघतच राहिले

अस्वल बुडाले म्हणून निघून गेले

थोड्या वेळाने कापूस तरंगू लागला

पाय-या चढून कापूसकोंड्याही आला

जीव मुठीत धरून घराकडे पळाला

झाली फजिती अशी

घडली अद्दल कापूसकोंड्याला कशी...

## माझा मी समर्थ

**03 . 04 . 2014**

नाही पसंत मला जगणे

कुंडीतल्या झाडासारखे

घोटभर पिऊन पाणी

वीतभर मान डोकावने

कुठल्यातरी बंदीस्त बाल्कनीत

अथवा छताच्या सावलीत

शोभेची वस्तू म्हणून

नाही घुस्मटायचे मला

कुंडीतल्या झाडासारखे

त्यापेक्षा...

खोलवर रूजून भईत

गवसणी घालेन आकाशाला

रखरखत्या उन्हात तिष्ठेन

माळरानी बांधाला

माझे मी शोधेन पाणी

वा आर्द्रतेवरही जगेन

डोक्यावर सूर्य घेऊन

वा-यासंगे नाचेन

वाटाड्याला देईन सावली

पशुपक्ष्यांना आसरा

पाने फुले फळे वाटीन

घेऊन चेहरा हसरा

मोकळा श्वास घेईल मोकळे मन

माझा मी समर्थ ना कसले बंधन .

## पिंड

03 . 04 . 2014

ज्याचे जैसे पिंड
तया भेटते तैसे झुंड
ओढ प्रकृतींची सम
मवाळ वा गुंड

ज्याचे जैसे पिंड
तया भेटते तैसे झुंड
ओढ स्वभावी सम
शीतल वा मार्तंड

ज्याचे जैसे पिंड
तया भेटते तैसे झुंड
ओढ कर्माची सम
मिरवणूक वा धिंड

ज्याचे जैसे पिंड
तया भेटते तैसे झुंड
ओढ आचारी सम
वहिवाट वा खिंड

ज्याचे जैसे पिंड

तया भेटतै तैसे झुंड

ओढ विचारी सम

स्तुत्य वा निंद्य

## जर्जर

03 . 04 . 2014

शिशिरात गळाली पाने

ना फुटली पालवी वसंतात

ग्रीष्मात सुकल्या फांद्या

ना उगवले कोंब वर्षात

शरदात डिसरला बुंधा

ना मिळाले ऊन हेमंतात

अंतयात्रा चालणार कुठवर

झाला सगळा देह जर्जर .

## मनाचे काय?

03.04.2014

शिंपडले गोमुत्र

झाला परिसर पवित्र

मनाचे काय?

शिंपडले अत्तर

झाले सुगंधी वस्त्र

मनाचे काय?

माळला गजरा

झाले सुवासिक केस

मनाचे काय?

केला श्रृंगार

झाला देखणा देह

मनाचे काय?

## स्पंदनसखी

07 . 07 . 2013

सखी मैत्रीणी साजनी

परिमळ वृष्टीत न्हाऊनि

अमृततुषार झेलुनि

गाऊ वेभान प्रीतगाणी

बिलगले ह्दय ह्दयास जेव्हा

जाहली एकरूप स्पंदने तेव्हा

तू वाटतेस मला माझ्यासारखी

चांदण्यात चालली चंद्राची पालखी

तुझे लपुनि पाहणे

पाहुनि गालात हसणे

हसून डोळ्यांत लाजने

लाजूनि वळून पाहणे

जाहलो पुरापुरा फिदा

पाहुनि ऐश्या निराळया अदा

जितका जास्त मी तुला पाहतो

तितकी अधिक तू सुंदर दिसतेस

जितक्यांदा मी तुला आठवतो

त्याहूनही अधिक तू मला आवडतेस .

## साथ

14 . 07 . 2013

अरे हळव्या मना नको इतक्यात धीर सोडू
उगा थोडक्यासाठी नको अनुबंध तोडू

मिटेपर्यंत पापण्या वाट नकोस सोडू
उमलूदे पाकळ्या कळ्या नकोस तोडू

आली झुळुक वा-याची घेऊनि खबर येण्याची
घमघमला परिमळ वाढली आतुरता पाहण्याची

एकटक नजर चातकी आभाळी लागली
सुधावृष्टीविना तहान अजुनि नाही भागली

एकदा एकांतात होईल जेव्हा भेट
सांगून टाकीन मनातले गुपीत तेव्हा थेट

फुलेल चैतन्य आयुष्यात
कळेल बात  माझी
एकट्या ह्या जगण्यात
मिळेल साथ तुझी .

## मकरंद

03 . 04 . 2014

झाल्या मोकळ्या पाकळ्या

आल्या तारूण्यात कळ्या

तुटल्या सुगंधी साखळया

भरल्या हवेच्या पोकळया

दरवळली घमघम भवताली

खुलली लाली हसू गाली

लागली चाहूल भ्रमराला

आला आला रूणुझुणु आला

कुणीच नव्हते राखायला

आला स्वच्छंद मकरंद चाखायला

गेला गेला गुणुगुणु गेला

नेला नेला अंतरीचा ठेवा नेला .

## प्रियकर माझा निराळा

03 . 04 . 2014

निर्झर म्हणाला नदीला

लगबगीने कुणाला भेटायला ?

प्रियकर माझा निराळा निळा

घाई अंतर दूरचे गाठायला

घेईल कवेत सामावून मजला

मिठीत त्याच्या एकजीव सजला

नाही उरणार माझी मीच

त्याचेच नाव ओळखही त्याचीच .

## केव्हाचा

**03 . 04 . 2014**

केव्हाचा मी उभा समाधीस्थ

एका पायावर बगळयासारखा

केव्हाची मी पाहतोय वाट

पावसाची तृषार्त चातकासारखा

केव्हाचा मी पाहतोय तुला

सूर्य जसा कमळपुष्पाला

केव्हाचा मी शोधतोय तुला

मोर जसा घनजलाला

केव्हा उजाडेल केव्हा भेटशील

केव्हा बोलशील केव्हा हसशील

केव्हा देशील हात हाती

केव्हा घेशील बाहुपाशी

जिंकेन मन पाळून नियम .

मिळवेन तुला ठेवून संयम .

## प्रेमसंदेश

04 . 04 . 2014

विसरेन कसा तुझा चेहरा
शब्दांनी रेखाटलय चित्र
आठवणींवर ठेवलाय पहारा
तूच सुहृद तूच मनमित्र

सांगायचे आहे बरेच काही
पण प्रत्यक्ष भेटल्यावर
गुपीत आता उरलच नाही
डोळयांत तुझ्या पाहिल्यावर

वेळोवेळी केला धावा
तुझ्याच मिलनाचा
उडाला पाखरांचा थवा
घेऊनि संदेश प्रेमाचा .

## लावण्यखणी

**07 . 07 . 2014**

कशी चमचमते बिंदी भाळी

जशी चांदणी आभाळी

कशी खणखणती कांकणे हाती

जशी पाखरे किलबिल गाती

कशी रूणझुणती पैंजणे पावली

जशी आरती राऊळी

कशी मोहरते लाली गाली

जशी ताटवे गुलाबी

कुशी डुलती कुंडले कानी

जशी परी हिंदोळी

कशी लखलखते माळ गळी

जशी नक्षत्रांची रांगोळी

सुबक सुरेख दिसते देखणी

नटली थटली लावण्यखणी .

## पण

**03 . 07 . 2014**

बालपण म्हणजे परवानगी
पाहिजे तसे करण्याची
तरूणपण म्हणजे मुभा
मनासारखे करण्याची
म्हातारपण म्हणजे सवलत
जमतय तेवढ करण्याची

शहाणपण म्हणजे निषेध
चुकीचे ते करण्याचा
आजारपण म्हणजे त्याग
आवडते ते करण्याचा
बाळंतपण म्हणजे संयम
वाटते ते करण्याचा

पण असतो कालावधी
क्षणाचा जीवनाचा
पण असते अवस्था
देहाची मनाची .

## झुंज

03 . 07 . 2014

रात्र सारी तेवलो

वात दिव्याची जागून

उजळले सारे कोपरे

सूर्यासारखे वागून

आला वारा फुलवून पिसारा

उठला अंगावर शहारा

घेतले काळीज ओंजळीत

निःश्वास काजळी गळीत

नाही काळजी नाही खंत

झुंजेन अखेरच्या श्वासापर्यंत

## घड्या

03 . 07 . 2014

केव्हाचा अंधारात चाचपडतोयस रे वेड्या

वाट कुणाची पाहतोयस टाक तोडुनि बेड्या

का उभा सुंभासारखा बोल काहीतरी गड्या

नुसतीच स्वप्ने रंगवू नकोस नको थापा मारूस वड्या

कशाला एकमेकांच्या ओढतोयस शेंड्या नि दाढया

पुरे झाल्या आपसातल्या कुरघोड्या नि चाड्या

खर काय ते घेना जानून नको टांग खेचूस खड्या

विस्कटलेल्या जीवनाच्या घालाशील नीट घड्या .

## घनजल

03 . 07 . 2014

वन वन वन वारा वाहिला

घन घन घन गरजत आला

छन छन छन जल बरसून गेला

तन तन तन भिजवून गेला

कण कण कण तृप्त न्हाला

क्षण क्षण क्षण नाचू लागला

मन मन मन हरकून गेला

जन जन जन सुखी जाहला .

## बरे झाले देवा !

03.07.2014

बरे झाले देवा !

तू दिसत नाहीस...

नुसत्या डोळयाने अथवा चष्म्याने

दुर्बीनीने अथवा सूक्ष्मदर्शीने

नाहीतर...

ईहलोकांनी तुझा नसता सोडला पिछा

ऐकविली असती गा-हाणे नवस नि ईच्छा

मोबदल्याचे दाखवून अमिष

तुलाही केले असते खरेदी

चमत्कार दाखव नाहीतर

बनवले असते कैदी

भेटायला तुला

रांग लागली असती देणेकरांची

हो आणि घेणेकरांचीही

करून थेट प्रक्षेपण

केले असते पुरते युज

नियमीत हालचालीसुद्धा

बनल्या असत्या ब्रेकींग न्यूज

आस्तिकांनी सोडून कामधंदा

घातला असता तुला गराडा

नास्तिकांनी सोडून कामधंदा

संपवण्याचा केला असता इरादा

फास्तिकांनी तुझ्या नावावर

मांडली असती दुकाने

हुबेहुब तोतये बनवण्याचे

निघाले असते कारखाने

एवढ सगळ असूनसुद्धा

दे प्रत्यक्ष दर्शन एकदा

सांग सविस्तर आत्ता

नाव गाव फोननंबर पत्ता .

## मातीचा पुतळा

03 . 07 . 2014

मातीत रूजला

मातीत उगवला

मातीत वाढला

मातीचा पुतळा

मातीत पोसला

मातीत सोसला

मातीत मिळाला

मातीचा पुतळा

मातीच्या मोहापायी

मातीला विसरला

मातीवर मातला

मातीचा पुतळा .

## अहम् विसर्जन

03 . 07 . 2014

आठवत नाही कधीपासून

माहीत नाही केव्हापासून

झालीय ह्दयात स्थापना

'अहम' नावाच्या मुर्तीची

नित्यनेमाने होते आरती

मिथ्य मीच्या श्रेष्ठतेची

उधळतात स्तुतीसुमने

आणि खिरापत खुशामतीची

सजवून आरास ऐश्वर्याची

रोषणाई झगमग सत्तेची

आत्मबोध चिरचैतन्याचा करी

विसर्जन 'अहम्' भवसागरी .

## क्षितिज

03 . 07 . 2014

एरव्ही नव्हती कधीच

ओलांडली वेस साधी

केले नव्हते कधीच

सीमोल्लंघन या आधी

केला नव्हता कधीच

प्रयत्न परीघ मोजण्याचा

आता मात्र इरादा पक्का

क्षितिजाला शिवण्याचा .

## कुणी

12 . 07 . 2014

नभांगणी नक्षी नक्षत्रांची
    रेखाटली रांगोळी कुणी
अस्मानी इंद्रधनु कमानी
    भरले रंग कुणी
निळया आकाशाची निळाई
    मिसळली सागरात कुणी
फुले चंदनी कस्तुरी
    दरवळला सुगंध कुणी
पंखांत भरारी ऊरात उभारी
    संचारले चैतन्य कुणी
चालक्या मातीच्या मुक्या बाहुल्या
    केल्या बोलक्या कुणी .

## माझी लेखणी

22 . 03 . 2013

सुवाच्य सुंदर अक्षर लिहिणारी

निर्भीड नीडर विनधास्त बोलणारी

जनमत उमजून स्वमत मांडणारी

दृष्टीपल्याडच्या सृष्टीचा वेध घेणारी

स्वप्नांच्या दुनियेत मौज करणारी

कल्पनाविलासात गगणभरारी घेणारी

जनमनाशी थेट संवाद साधणारी

सोप्या भाषेत गहण विचार सांगणरी

निखळ निरागस प्रीतगीते गाणारी

विविध विषय सुलभ हाताळणारी

नवे विचार नव्या दमाने जाणणारी

रंग बदलत्या दुनियेचे वास्तव दर्शविणारी

मूढालाही शहाणे करून सोडणारी

सुविचारांना चालना देणारी

सुजनांना लगेचच भावनारी

क्षणभंगुर जीगण्यात प्रेमसंदेश देणारी

सूर्यासम तेजस चंद्रासम शीतल

बृहस्पती नि सरस्वतीची वाणी

सर्वांगसुंदर सर्वगुणसंपन्न अशी ...माझी लेखणी .